# वीजवाहिन्यांच्या क्षमतावाढीकडे दुर्लक्ष

## मुंबईच्या विद्युतपुरवठा अभ्यासासाठी समितीची स्थापना

- मागणी लवकरच ५५०० मेगावॉटवर
- वाहिन्यांची क्षमता वाढवण्यावर हवा भर
- उरणमध्ये वीजनिर्मितीवर विचार

म. टा. प्रतिनिधी

**वांद्रे :** वीजपुरवठ्यामध्ये अचानक बिघाड झाल्यास, आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरातील वीज पुरवठा सुरळीत असावा यासाठी बाहेरील अधिकाधिक वीज मुंबईला कशी देता येईल यासंबंधी अभ्यास करणारी एक समिती राज्य सरकारने स्थापन केली आहे. पण, बाहेरील वीज मुंबईला मिळाली, तरी ही वीज मुंबईपर्यंत आणणार कुठून आणि कशी? तसेच वीजवाहिन्या सक्षमीकरणाबाबतचा कुठलाही उल्लेख समितीच्या 'टास्क'मध्ये दिसून येत नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

या वर्षी १२ ऑक्टोबरला मुंबईचा वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला होता. बाहेरुन मुंबईत वीज आणणाऱ्या निवडक वाहिन्यांमध्ये अचानक बिघाड झाला. त्यावेळी मुंबईचे वीज जाळे स्वतंत्र करणारी 'आयलँडिंग' प्रणाली यशस्वी झाली नाही. प्रामुख्याने टाटा पॉवरचा ट्रॉम्बेतील संच सुरू न झाल्याने ही प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित झाली नव्हती. यासंबंधी दोन समित्यांनंतर आता राज्य सरकारने पुन्हा एकदा तिसऱ्या समितीची स्थापना केली आहे. परंतु, या तिसऱ्या समितीला करावयाच्या अभ्यासातदेखील वीज आणणाऱ्या वाहिन्यांचा सकृद्दर्शनी कुठलाही उल्लेख नाही.



मुंबईसाठी राखीव असलेल्या वीजनिर्मितीचा करार २०२४ ला संपुष्टात येत आहे. यामुळेच त्याआधी मुंबईला अधिकाधिक वीज बाहेरुन कशी मिळावी, याचा अभ्यास या समितीला करण्यास सांगण्यात आले आहे. उरण, रत्नागिरी या वीजनिर्मिती प्रकल्पांमधील अधिकाधिक वीज मुंबईला मिळावी, उरण येथे मुंबईसाठी स्वतंत्र वीजनिर्मिती व्हावी, यासाठी काय करता येईल याचा अभ्यास समितीला करायचा आहे. परंतु ही वीज मुंबईत आणण्याच्या सक्षमीकरणाबाबत काय? असा प्रश्न वीज वितरण क्षेत्राकडून उपस्थित होत आहे.

मुंबईत बाहेरुन येणाऱ्या विजेसाठी पडघा-कळवा व ऐरोली-कळवा अशा दोन प्रमुख वाहिन्या आहेत. या दोन वाहिन्यांमार्फत मुंबईत जवळपास निम्मी वीज येते. १२ ऑक्टोबरच्या घोळात या वाहिन्यांमध्येच बिघाड झाला होता. त्यामुळे वास्तवात मुंबईत वीज आणणाऱ्या वाहिन्यांची क्षमता वाढविण्याची गरज आहे. बाहेरील कितीही वीज मुंबईसाठी राखीव केली, तर वाहिन्या सक्षम असतील तरच त्याचा फायदा होईल. अन्यथा कितीही वीज मुंबईसाठी राखीव ठेवली गेली तरी उपयोग नाही, असे मत संबंधितांनी नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केले आहे.

### उल्लेख फक्त १ हजार मेगावॉटचा

मुंबईतील सध्याच्या वीज मागणी ३ हजार ५०० मेगावॉट असून ती तीन-चार वर्षांत ५ हजार ५०० मेगावॉटच्या घरात जाण्याची शक्यता आहे. त्या तुलनेत सध्याची पारेषण क्षमता जेमतेम २ हजार २०० मेगावॉट आहे. ती वाढविण्यासाठी १ हजार मेगावॉटच्या वाहिनीचा अभ्यास करण्याची सूचना समितीला देण्यात आली आहे. परंतु, ही १ हजार मेगावॉट वाहिनी उभी करण्याचे काम सुरू झालेले आहे.

# तेलाच्या दरांना उकळी



- नोव्हेंबरअखेर नंतर आवक वाढली
- हॉटेल्स, रेस्तरां सुरू झाल्याचा परिणाम
- रोजची मागणी १४ हजार टनांवर

म.टा. प्रतिनिधी

**धोबी तलाव :** देशात सर्वाधिक मागणी असलेल्या मुंबईतील खाद्यतेल बाजारात तेलाचे दर सध्या उच्च पातळीवर स्थिरावले आहे. तेलाची आवक किंचित वाढली असली, तरी आतापर्यंत बंद असलेली शहरातील हॉटेल्स, रेस्तरां सुरू झाली आहेत. परिणामी तेलाच्या मागणीत वाढ झाल्यामुळे दर घटले नाहीत, असे महाराष्ट्र खाद्यतेल असोसिएशनच्या धोबी तलाव येथील मुख्यालयातील पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने, शहरात सातत्याने येणारे-जाणारे लोक आहेत. देशाच्या अन्य मोठ्या शहरांच्या तुलनेत सर्वाधिक लोकसंख्या मुंबईत आहे. यामुळे रस्त्यावरील खाद्यान्नांचे स्टॉल्स, उपनगरीय रेल्वे स्थानकांवरील स्टॉल्स, छोटी-मोठी हॉटेल्स, रेस्तरां यांची संख्याही अन्य शहरांच्या तुलनेत मुंबईत भरपूर आहे. यामुळेच देशाच्या एकूण मागणीच्या १८ ते २० टक्के खाद्यतेलाची गरज मुंबईतच असते.

खाद्यतेल असोसिएशनचे अध्यक्ष शंकरभाई ठक्कर यांनी सांगितले की, 'लॉकडाउन काळात तसेच नोव्हेंबरच्या सुरुवातीपर्यंत तेलाची आवक कमी झाली होती. त्यावेळी मागणीही फारशी वाढलेली नव्हती. पण आता मागील दीड महिन्यात मुंबईसारख्या शहरातील तेलाच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी विविध मार्गांनी आवक वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यातून सर्वाधिक मागणीच्या पाम तेलाची आवक वाढली. पण, एकूणच हॉटेल्स व खाद्यान्नांचे स्टॉल्स मोठ्या संख्येने सुरू झाल्यामुळे आवक वाढल्यानंतरही दर घसरलेले नाहीत.'

भारताला दरवर्षी जवळपास २.३० कोटी टन खाद्यतेलाची गरज असते. त्यातील सुमारे ४५ लाख टन, अर्थात मासिक ३ लाख टन व दररोज १२ हजार टन तेलाची मागणी मुंबई शहर व उपनगरातून असते. लॉकडाउन काळात रोजची मागणी २ ते ३ हजार टनांदरम्यानच होती. नोव्हेंबरच्या सुरुवातीपर्यंत रोजची मागणी ६ ते ७ हजार टनांवर पोहोचली होती. आता सध्या ही मागणी १४ हजार टनांच्या घरात गेली आहे. त्यामुळेच दर उच्च स्तरावर स्थिरावल्याचे मुंबईतील व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

### प्रमुख खाद्यतेलांचे मुंबईतील दर असे

| खाद्यतेलाचा प्रकार | सप्टेंबरचे दर (रु.) | सध्या (रु.) |
|---|---|---|
| पामतेल | ८०-८५ | १००-१०५ |
| सूर्यफुल | ९०-९५ | ११०-११५ |
| सोयाबीन | ९२-९८ | ११५-१२० |
| शेंगदाणा | ११५-१२० | १३५-१५५ |
| राइसब्रान | ९०-९५ | १०५-११० |



# 'विद्यालंकार'मध्ये 'अटल' डिझाइन कार्यशाळा

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** 'विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याने त्यांनी स्वतःला नेहमी अद्ययावत ठेवणे क्रमप्राप्त आहे. अटल ॲकॅडमीच्या माध्यमातून देशभातील हजारो शिक्षक या ज्ञानयज्ञात निःशुल्कपणे सहभागी होत आहेत', अशी भावना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे सहसंचालक डॉ. गिरीधारीलाल गर्ग यांनी व्यक्त केली.

विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे ७ ते ११ डिसेंबर दरम्यान अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेतर्फे डिझाईन थिंकींग या नाविन्यपूर्ण विषयांवर 'अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले होते. या पाच दिवसीय ऑनलाइन कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. गर्ग यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. विद्यालंकारच्या विद्यार्थीभिमुख अनेक उपक्रमांचे त्यांनी यावेळी विशेष कौतुक केले. या ऑनलाइन कार्यशाळेत सिंगापूर येथील उद्योजक आणि डिझाईन थिंकिंग तज्ज्ञ योगेश तडवळकर, अथबास्का युनिव्हर्सिटी कॅनडा येथील डॉ. मायगा चँग, एनपीटेलचे प्रा. डॉ. बाला रामदुराई, डॉ. अनिता दिवाकर, डॉ. ओंकार माटे, अरुण रामन, नीतू चक्रवर्ती, कल्पक चव्हाण, अजय अग्रवाल, टीसीएस चे संजय नायक आणि इंदिरा बासू यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉलेजच्या उपप्राचार्या प्रा. वर्षा भोसले यांनी केले. मुख्य शैक्षणिक अधिकारी डॉ. सौरभ मेहता यांनी क्रमिक अभ्यासक्रमासोबत अनेकाविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित ओक यांनी उपयोजित, पूरक उपक्रमांची माहिती दिली. संयोजक प्रा. सोनाली बोरकर यांनी डिझाईन थिंकिंगची उपयुक्तता आणि संकल्पना मांडली. अटल एफडीपीचे समन्वयक प्रा. अंबादास देशमुख यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

### सिटी CLICK

शैलेश जाधव




**'मंत्रालय' दिसेनासे ...** मंत्र्यांच्या बंगल्यांच्या सुशोभिकरणासाठी राज्याच्या तिजोरातून कोट्यवधींचा खर्च होत असताना, संपूर्ण राज्याची सूत्रे जिथून हलतात ते 'मंत्रालय' मात्र दिसेनासे झाले आहे. मंत्रालयाच्या वास्तूवर ठळकपणे उठून दिसणारा हा शब्द गेल्या काही दिवसांपासून वाचता येईनासा झालाय.

# 'स्वयं टॉक्स' १७ जानेवारीला

**मुंबई :** 'स्वयं परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून'तर्फे रविवार, १७ जानेवारी २०२१ रोजी 'स्वयं टॉक्स' हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात, करोना संकटकाळात अथक वैद्यकीय सेवा देणारी संस्था 'सेवांकुर' तसेच लडाखमध्ये ५५५ कि.मी. धावलेले एकमेव भारतीय आशिष कासोदेकर यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांशी डॉ. उदय निरगुडकर संवाद साधणार आहेत. अंटार्क्टिका मोहिमेसाठी निवड झालेल्या डॉक्टर डॉ. मधुबाला चिंचाळकर, औषध व पेटंटच्या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. मृदुला बेळे, संगीततज्ज्ञ डॉ. गिरीश चरवड, उद्योजिका सोनाली फडके व धारा काबरिया, तंत्रज्ञानतज्ज्ञ व उद्यमशाली उद्योजक धैर्य दंड, फॉरेन्सिक अकाऊंटिंगमधील तज्ज्ञ डॉ. अपूर्वा जोशी यांचा वक्त्यांमध्ये समावेश आहे. हा कार्यक्रम सकाळी १० वाजता सुरू होईल. रहेजा सभागृह, बालगंधर्व रंगमंदिर, वांद्रे पश्चिम येथे होईल.

# 'ग्रंथाली'चा वाचकदिन शुक्रवारी

म. टा. विशेष प्रतिनिधी



**मुंबई :** 'ग्रंथाली'चा सेहेचाळीसावा वाचकदिन यंदा शुक्रवार, २५ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता दादर-माटुंगा कल्चरल सेंटरच्या सभागृहात साजरा होणार आहे. करोनाविषयक निर्बंधांमुळे प्रत्यक्ष मोजक्या रसिकांच्या उपस्थितीतच कार्यक्रम करणे शक्य असल्याने, प्रथम नोंदणी करणाऱ्या शंभर जणांनाच यामध्ये सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे. दरवर्षीप्रमाणे वाचकदिनी काही पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. त्यात स्वरमंजूषा (योजना शिवानंद), नाटक-एक मुक्त चिंतन (रवींद्र लाखे), आस (अपर्णा महाजन), माध्यम यात्रेतील माणसे (रविराज गंधे), नोबेलनगरीतील नवलस्वप्ने (सुधीर थत्ते/नंदिनी थत्ते) आणि टपालकी (सॅबी परेरा) या पुस्तकांचा समावेश आहे.

'मॅट'च्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर, 'एबीपी माझा'चे संपादक राजीव खांडेकर आणि कवी सौमित्र यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येईल. यावेळी महाराष्ट्राच्या हिरकमहोत्सवाच्या औचित्याने 'महाराष्ट्रा'साठी' हा सांगीतिक कार्यक्रमही होणार आहे. त्याचे संयोजन संगीतकार कौशल इनामदार यांनी केले असून, संहिता लेखन अरुण जोशी यांचे आहे.

- मोजक्या रसिकांची उपस्थिती
- ऑनलाइन पाहण्याचीही सुविधा

वाचकदिनाच्या निमित्ताने 'ग्रंथाली'ने सलग चौथ्या वर्षी अभिवाचन स्पर्धा आयोजित केली होती. 'व्हिजन व्हॉइस एन ॲक्ट'च्या सहकार्याने यंदाही ही स्पर्धा डिजिटल माध्यमातून झाली. त्यातील विजेत्यांना या कार्यक्रमात पारितोषिके प्रदान केली जातील. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या सहा पुस्तकांचा संच वाचकांना अवघ्या पाचशे रुपयांत (मूळ किंमत दीड हजार रुपये) उपलब्ध असेल. त्याचबरोबर संच खरेदी करणाऱ्या पहिल्या दोनशे वाचकांना 'स्टोरीटेल'चे ७९९ रुपयांचे कार्ड भेट दिले जाईल. त्याचा वाचकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले आहे.

वाचकदिनाचा हा कार्यक्रम Granthali Watch या फेसबुकपेजवर रसिकांना थेट पाहायला मिळणार आहे. ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची इच्छा असेल त्यांनी ९००४९४९६५६ या क्रमांकावर नावनोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


# मुंबई विद्यापीठाला सुवर्ण पदक

म. टा. विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** भारतीय विद्यापीठ संघाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवात मुंबई विद्यापीठाने राष्ट्रीय सुवर्ण पदक पटकाविले आहे. कृषी या गटातून 'मल्टी ॲग्रो मेकॅनिझम' या प्रकल्पास राष्ट्रीय सुवर्ण पारितोषिक बहाल करण्यात आले आहे. भोपाळ येथील राजीव गांधी तंत्रज्ञान विद्यापीठ येथे आभासी पद्धतीने अलीकडेच ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.




ही स्पर्धा दोन स्तरांवर पार पडते. प्रथम स्तरावर पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि मध्य विभाग स्तरावर प्राथमिक फेरी होते. पाच विभागातील अंतिम विजेते हे राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरतात. या राष्ट्रीय महोत्सवात देशातील एकूण ४५ विद्यापीठांचे संशोधन प्रकल्प पात्र ठरले होते. पश्चिम क्षेत्र विभागातून मुंबई विद्यापीठ या स्पर्धेत सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठातील अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारे विक्रांत पाल, कुणार पवार आणि पंकज पाटील या तीनही विद्यार्थ्यांनी मिळून 'मल्टी ॲग्रो मॅकेनिझम' नावाचे यंत्र तयार केले. पेरणी, फवारणी, कापणी, मातीची निगा, दोन रोपातील गवत काढणे, गवताची मुळे उखळून काढणे अशी सहा विविध प्रकारची कामे ही एकाच यंत्राद्वारे करण्याची किमया साधणारे अत्यंत अल्प दरातील यंत्र या विद्यार्थ्यांनी तयार केले आहे. विशेष म्हणजे हे यंत्र सौरऊर्जेवर चालणारे आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यापीठ विकास विभागाने या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



# घरच्या घरी बनवा बास्केट

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** आपल्या घरात अथवा शिंप्याकडे कापडाचे अनेक छोटे-मोठे तुकडे उरतात, चिंध्या असतात. त्याच उरलेल्या कापडापासून चांगले बास्केट कसं करता येईल हे शिकण्याची अनोखी संधी 'महाराष्ट्र टाइम्स कल्चर क्लब'ने खास तुमच्यासाठी आणली आहे. येत्या मंगळवार, २२ डिसेंबर रोजी 'फॅब्रिक कॉइल विविंग बास्केट' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्ट आणि क्राफ्ट क्षेत्रात शेकडो कार्यशाळा घेतलेल्या चंद्रिका कामथ मार्गदर्शन करणार आहेत.



महाराष्ट्र टाइम्स CULTURE Club

घरामध्ये मोबाइल फोन आणि टीव्हीचा रिमोट कंट्रोल वगैरे गोष्टी इतस्ततः ठेवल्या जातात. रोजच्या वापरातील छोट्या गोष्टी एका जागी ठेवण्यासाठी कापडापासून तयार केलेले हे बास्केट तुम्हाला उपयुक्त ठरेल. या बास्केटमध्ये छोट्या गोष्टी ठेवता येतील. तसेच हे बास्केट मोठ्या आकाराचे केले तर त्यात मोठ्या गोष्टीही ठेवता येऊ शकतील. दोरीला कापडाच्या पट्ट्या गुंडाळून मग ते एकमेकांना गोलाकार शिवून हे बास्केट तयार केले जाते. यात मुख्यतः कापड, दोरी, सुई-धागा या गोष्टींचा वापर होतो. कार्यशाळेत फॅब्रिक कॉइल विविंग बास्केट बनविण्याची प्रक्रिया आणि बारकावे विस्तृतपणे सांगितले जातील.

करोनाच्या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा 'झूम ॲप'च्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीनं होणार आहे. यात मार्गदर्शन करणाऱ्या चंद्रिका कामथ यांनी आर्ट आणि क्राफ्ट क्षेत्रात यांनी केवळ भारतातच नव्हे, तर इजिप्त, श्रीलंका, इंडोनेशियात जाऊन कार्यशाळा घेतलेल्या आहेत.

- **प्रवेश शुल्क :-** मटा कल्चर क्लब सभासद - २५०/- , सभासद नसलेले - ३५०/-
- **कुशन कव्हर पेंटिंग कार्यशाळा :-** २२ डिसेंबर २०२०
- **कार्यशाळेची वेळ :-** दुपारी ३ ते ५
- **नोंदणीसाठी संपर्क :-** ९८२१०३६७९० / ९१६७७११६४९
- **mtcultureclub.com** या वेबसाइटवरसुद्धा तुम्ही नोंदणी करू शकता.

**साहित्य**

- जाड कापसाची दोरा (कॉटन रोप) अथवा दोरा झाकण्यासाठी विविध शेड्सचे २" वाइड प्रिंटेड कॉटन फॅब्रिक स्ट्रीप्स.
- गोधडी धागा क्र.१० आणि थिक व मोठी सुई.

**तुमच्या समस्या मांडा**

महामुंबईकरांना प्रवास कधीच चुकलेला नाही. मुंबईतील प्रवासादरम्यानचे असेच तुमचे अनुभव फोटोसह आम्हाला कळवा. या समस्या matapratisad@gmail.com या ईमेलवर नाव, संपर्क क्रमांकासह पाठवा.




म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबईकरांच्या प्रवासाचे मुख्य साधन असलेली लोकल ट्रेन अद्याप सर्व सर्वसामान्य प्रवाशांसाठी उपलब्ध होऊ शकलेली नाही. बेस्ट बसेसना खूप गर्दी होताना दिसतेय. अशा परिस्थितीत प्रवासासाठी खासगी वाहनांचा वापर वाढताना दिसतोय. गेल्या काही दिवसांत मुंबई शहरातील वाहनविक्री वाढली आहे. त्यामुळे दुचाकी-चारचाकी वापर खूप होत असून, मुंबईकरांना रस्त्यांवर प्रचंड वाहतूककोंडीचा सामना करावा लागतोय. तासनतास वाहतूककोंडीत अडकून पडणे नित्याचे झाले आहे. वाहतूककोंडीची-पार्किंगची समस्या सुटावी, अशी अपेक्षा मुंबईकर व्यक्त करीत आहेत. यासंदर्भात 'मुंबई टाइम्स'मध्ये नुकत्याच प्रकाशित करण्यात आलेल्या वृत्त मालिकेवर वाचकांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. आमच्या ई-मेलवर आयडीवर आलेल्या वाचकांच्या प्रतिक्रियांपैकी या काही निवडक प्रतिक्रिया.

# वाहतूककोंडी सुटणार कधी?

### रस्ते-पार्किंगची सोय

दुचाकींच्या संख्येत २४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. शहरातील रस्त्यांवर प्रति किलोमीटर अंदाजे तब्बल १ हजार १७५ दुचाकी धावत असतात. त्या तुलनेत रस्ते पुरेसे नसल्याने ही बाब चिंतेची होत चालली आहे. त्याचबरोबर वाहनांचे पार्किंग हा एक मोठा चिंतेचा विषय आहे. पार्किंगवरुन वादही होत असल्याने पुरेशा वाहनतळांची सोय सर्वत्र होण्याची गरज आहे.

- विनोद जोशी

### वाहतूककोंडीने वैताग

काही वर्षे आधी दहिसर ते मिरारोड, या सहा किमी अंतरासाठी जेमतेम २५ मिनीटे लागत असे. आता त्यासाठी बऱ्याचदा दोन-दोन तास लागतात. लोकल गाड्या सर्वसामान्यांसाठी बंद आहेत. नोकरीवर जाणे आवश्यक असल्याने स्वतःच्या वाहनाने कार्यालय गाठावे लागते. त्यातून वाढलेल्या वाहतूककोंडीला मुंबईकर खूप वैतागला आहे. रस्त्यांची उपलब्धता हा विषयदेखील तितकाच गंभीर असा आहे.

- संजय मोरे

### डोळ्यांवर प्रकाशझोत

नवीन वाहनांचे मुख्य दिवे खूप प्रखर असतात. प्रकाशाचा झोत रस्त्यावर पडण्याऐवजी पादचारी आणि समोरील वाहनचालकांच्या डोळ्यांवर पडतो. अशी वाहने चारही दिशांनी आली की डोळे दिपतात व चालणे अथवा रस्ता ओलांडताना खूप त्रास होतो. यामुळे सर्व वाहनांचे प्रकाशझोत रस्त्यावर पसरेल, अशी वाहनांत सोय करायला हवी.

- राजीव जोशी

मनोरंजन
नाटक
॥ हम गया नही जिंदा है ॥ चित्रपट शुभमुहूर्त निमित्ताने श्री अभिषेक वसंत निकम आयोजित
online booking @ book my show
दत्तजयंती सप्ताह, नववर्ष प्रयोग व तिकीटांसाठी संपर्क ९३२२११६१२११।८७६७७०२३९०
उद्या सायं ७॥
गडकरी रंगायतन , ठाणे
(दत्त जयंती कोकण दौरा)
श्री स्वामी समर्थ भूमिकेत (कृपासिंधु) प्रफुल्ल सामंत
श्री स्वामी प्रॉडक्शन्स श्री चिंतामण प्रॉडक्शन्स अर्चना थिएटर्स निर्मित
राजन शंकर कोठारकर लिखित व दिग्दर्शित



अनंतकोटी
भारतभर गाजत असलेले सर्वाधिक मागणीचे प्रसन्न, अविस्मरणीय HI-CLASS नाटक
तुमच्या गावात, उत्सवात, मंडळात कधी?

**मटा CITIZEN REPORTER**

मटा सिटीझन रिपोर्टर ॲप तीन नव्या वैशिष्ट्यांसह!

बदल करण्याच्या तीन स्टेप्स

१ गुगल प्ले किंवा ॲप स्टोअरमध्ये जाऊन MT CitizenReporter सर्च करावे.

२ ॲप इन्स्टॉल करा. स्वतःला रजिस्टर करा.

३ आपल्या बातम्या, छायाचित्रे, व्हिडीओ आणि ऑडीओ अपलोड करा.

पाठवलेल्या बातम्या आणि फोटो तुम्ही mtonline.in/citizenreporterवर जाऊन पाहू शकता आणि त्या सोशल मीडियावर शेअरही करू शकता.



चारकोप

### अडथळा ठरतोय चर

चारकोप येथील सह्याद्री नगरच्या समोर मुख्य रस्त्यावर हा असा मोठा चर तयार झाला असून, बरेच दिवस होऊनही तो अजूनही बुजवण्यात आलेला नाही. या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता आहे. तरी तो बुजवण्यात यावा ही विनंती.

- योगेश पडवळ



ग्रँटरोड

### अवैध पार्किंग

ग्रँटरोड पूर्वेला असलेल्या मौलाना आझाद रोडवरील रॉयल सिनेमाजवळ अशा प्रकारे वाहने रस्त्यात उभी करण्यात येत आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांना आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी.

- संजय लिमकर




प्रभादेवी

### पोलिस चौकीची दुरवस्था

प्रभादेवी येथील बाबासाहेब वरळीकर चौकातील या पोलिस बिट चौकीची अवस्था अशी झाली आहे. या चौकीची त्वरित डागडुजी अथवा पुनर्बांधणी व्हायला हवी.

- प्रदीप शिंदे